बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक २०२ ▪ रविवार, दि. ३० नोव्हेंबर, २०२५ ▪ पोस्टल दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-202 ▪ Sunday 30 November, 2025 ▪ Postal Date 01 December, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# थापा मारणारे कोण अन् काम करणारा कोण हे ओळखल्याने मुस्लिम समाज अजितदादांच्या पाठीशी : नवाब मलिक

सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

## माजी मंत्री नवाब मलिक यांची दैनिक किसान कार्यालयाला सदिच्छा भेट...



**बीड । किसान न्युज**

**काहींनी थापा मारुन मुस्लिमांचा बुद्धीभेद केला होता. पण थापा मारणारे कोण अन् काम करणारा कोण हे समजल्याने समाज मोठ्या संख्येने अजितदादांच्या पाठीशी उभा राहिला आहे. तेच असे नेते आहेत जे फक्त विकास आणि सर्वसमावेशक भूमिका घेऊन चालत आहेत. विकास पाहिजे असेल तर अजितदादांना बळ द्या हेच सांगण्यासाठी आल्याचे माजी मंत्री नवाब मलिक यांनी दैनिक किसान कार्यालयाला सदिच्छा भेट दिली त्यावेळी म्हणाले तर यावेळी त्यांनी किसानचे कौतुक केले.**

### दादांची फक्त विकासाची अन् सर्वसमावेशक भूमिका

नगरपरीषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री जेष्ठ नेते नवाब मलिक हे राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी बीड शहरात अनेक ठिकाणी गाठीभेटी घेऊन त्यांनी विकास पाहिजे असेल तर नगरपरिषदेत घड्याळाची सत्ता स्थापन करा असे आवाहन केले. त्यांच्या या गाठीभेटींना मोठा प्रतिसाद मिळाला असल्याने शहरात घडीचे वातावरण निर्माण झाले आहे. ते सायंकाळी अंबाजोगाई येथे ही सभा घेणार आहेत. दरम्यान नवाब मलिक यांनी दुपारी दैनिक किसान कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, लोकसभा, विधानसभा निवडणुकीत काहींनी मुस्लिम समाजाचा बुद्धीभेद केला होता. यामुळे तेंव्हा समाज काहीसा दूर दिसून आला. पण आता चित्र पालटले

» पान २ वर

# बीडमधील प्रभाग ३ (ब) चे आक्षेप असल्याने २० तारखेला मतदान!

## राजकारण तापले, निवडणूक आयोगाने मागविला अहवाल



**बीड । किसान न्युज**

नगरपरीषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमर नाईकवाडे आणि अमृत सारडा प्रभाग ३ ब मधून नगरसेवक पदासाठी अटीतटीच्या सामना होत असून, या जागेवर नाईकवाडे यांचा आक्षेप असल्याने याचा अहवाल निवडणूक आयोगाने अहवाल मागविला असल्याने येथील २ तारखेचे मतदान रद्द होऊन २० डिसेंबरला होण्याची शक्यता आहे. यामुळे येथे राजकारण तापले असल्याचे दिसून येत आहे. तर प्रभाग ३ ब जागेसाठी २० डिसेंबरला मतदान होईल आणि इतर नगराध्यक्ष आणि अ ची निवडणूक वेळेवर होईल. नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार शिगेला पोहोचला असून मतदानासाठी केवळ एक दिवस मध्ये आहे. प्रभाग क्रमांक ३ ब मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) पक्षाकडून अमर नाईकवाडे आणि भाजपाकडून अमृत सारडा असा अटीतटीचा सामना आहे. या प्रभागाकडे पूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. तर येथे अमर नाईकवाडे यांनी विरोधी उमेदवारावर अपील दाखल आहे. यामुळे येथे

» पान २ वर



# दादांच्या घड्याळाची निवडणूक लाडक्या बहिणींनी घेतली हातात

## रात्री झालेल्या सभेला महिलांची लक्षणीय उपस्थिती





### नगरपरिषद ताब्यात द्या असं काम करुन दाखवतो की, तुम्ही म्हणाल दादा लवकर बीड ला यायला पाहिजे होते : ना.पवार

**बीड । किसान न्युज**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची काल शनिवारी (दि.२९) सायंकाळी बशीरगंज भागात प्रचार सभा झाली. या सभेसाठी लाडक्या बहिणींची लक्षणीय उपस्थिती दिसून आल्याने ही निवडणूक लाडक्या बहिणींनी हातात घेतल्याचे दिसून आले. या सभेची गर्दी पाहता शहराचे वातावरण बदलून घड्याळमय झाले. नगरपरिषद एकदा ताब्यात द्या असे काम करून दाखवितो की, तुम्ही म्हणाल दादा बीडमध्ये लवकर यायला पाहिजे होते असे म्हणाले तर येत्या दोन तारखेला घड्याळ आणि धनुष्यबाण चिन्हा समोरील बटन दाबून आमच्या सर्व उमेदवारांना विजयी करा असे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) पक्ष आणि शिवसेना शिंदे युतीच्या बीड नगरपरीषद नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे आणि नगरसेवकपदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बशीरगंज येथे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांची काल शनिवारी (दि.२९) सायंकाळी विराट सभा झाली. या सभेची गर्दी पाहता नगरपरिषद निवडणुकीत घड्याळाचा गजर होणार असे चित्र दिसून आले. विशेष म्हणजे या सभेला लाडक्या बहिणींची लक्षणीय उपस्थिती होती. ही उपस्थिती पाहता आपला भाऊ

» पान २ वर

# बीडचा सामान्य मतदार आमच्यासोबत, त्यामुळे विजयाची तुतारी वाजणारच : संदीप क्षीरसागर



**बीड । किसान न्युज**

सातत्याने आम्ही लोकांच्या अडीअडचणी सोडवितो व लोकांच्या संपर्कात असतो. यामुळे सामान्य मतदार आमच्या सोबत असल्याने विजयाची तुतारी वाजणारच असे आ.संदीप क्षीरसागर यांनी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे आणि प्रभाग क्रमांक १, ३, ४ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.२९) सायंकाळी शहरातील चक्रधर नगर, मातोश्री मंगल कार्यालय, विठ्ठल मंदिर चौक पेठ बीड येथे प्रचारार्थ आयोजित कॉर्नर बैठकांत प्रतिपादन केले. या सभेला मतदारांची आलोट गर्दी दिसून आल्याने बीड करांच ठरलं, तुतारी वाजणारच अशी चर्चा सुरू झाली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आघाडीच्या बीड नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे यांच्या व प्रभाग १ मध्ये बबीता सुधाकर जाधव, अशोक मारूती काळे यांच्या प्रचारार्थ चक्रधर नगर, प्रभाग ४ मध्ये भास्कर भारत कांबळे, मंगलाबाई संजय चांदणे यांच्या प्रचारार्थ मातोश्री मंगल कार्यालय, पेठ बीड आणि प्रभाग ३ मध्ये रवी जयमल्हार बागल, राधा आकाश घोरपडे यांच्या प्रचारार्थ विठ्ठल मंदिर चौक पेठ बीड येथे या तीन प्रभागाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आ. संदीप क्षीरसागर यांनी शनिवारी (दि.२९) सायंकाळी कॉर्नर सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी मतदारांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असल्याने बीडच्या मतदारांच्या मनात तुतारी अन्

» पान २ वर

# बीडमध्ये एमआयएमचे शक्तीप्रदर्शन!

## आमदार माजिद हुसैन यांचे आक्रमक भाषणात विरोधकांवर तुफान प्रहार!

**बीड । किसान न्युज**



हैदराबाद येथील एमआयएम चे लोकप्रिय आणि दबंग आमदार माजिद हुसैन यांनी आज बीड शहरातील अडत मार्केट रोड आणि खासबाग परिसरात नगरपरिषद निवडणुकीतील एमआयएम च्या नगराध्यक्ष पदाच्या व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ भव्य प्रचारसभा घेतली. या सभेला युवकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याचे दृश्य संपूर्ण शहरभर दिसून आले.या वेळी एमआयएम महाराष्ट्र प्रदेश महासचिव समीर साजिद बिल्डर, एमआयएम बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक, निरीक्षक मंजुर साहेब, नगरसेवक मोहम्मद नसरोद्दीन साहेब यांच्यासह मजलिस चे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### संघटन कौशल्याची चमक; शेख शफीक भाऊ ठरले केंद्रबिंदू

**एमआयएमच्या अलीकडील सभेत उमटलेली विक्रमी गर्दी ही केवळ भावनेची लाट नव्हे, तर जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक यांच्या संघटनात्मक कौशल्याची ठोस साक्ष मानली जात आहे. गेल्या एक वर्षापासून त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने प्रभागनिहाय बैठकांचे आयोजन केले, नवे कार्यकर्ते जोडले आणि पक्षाच्या विचारांची सातत्याने मांडणी करत जनतेशी थेट संवाद साधला. विशेषतः युवकांना संधी, जबाबदारी आणि दिशा देत त्यांनी शहरभरात सक्षम कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे तयार केले आहे. या सभेत दिसलेल्या शिस्तबद्ध उपस्थितीपासून ते वातावरण निर्मितीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर शफिक भाऊंच्या संघटनात्मक नेतृत्वाचे दर्शन झाले. राजकीय विश्लेषकांच्या मते, 'ही गर्दी अचानक उसळलेली भावना नसून, सातत्य, संयम आणि जमिनीवरील कामाचे फलित आहे.' एमआयएमला मिळत असलेला जनसमर्थनाचा वाढता वेग हा शफिक भाऊंच्या नेतृत्वशैली, संवादकौशल्य आणि कार्यकर्त्यांच्या मनातील त्यांच्या प्रति असलेल्या विश्वासाचा स्पष्ट पुरावा आहे.**

# धनंजय मुंडेंना 'तो' भेटला अन् १२ वर्षांपूर्वी केलेल्या मदतीची काढली आठवण!

## कधी काळी केलेली मदत आशीर्वाद बनून पाठीशी उभी राहते यापेक्षा मोठे भाग्य अन् आनंद कोणता? मुंडेंची भावनिक पोस्ट व्हायरल

**परळी वै. । किसान न्युज**



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी बारा वर्षांपूर्वी एका लहान मुलाच्या हृदयावरील शस्त्रक्रियेला मदत केल्याची आठवण तब्बल १२ वर्षांच्या नंतर मूर्त स्वरूपात भेटल्याने एक वेगळाच सुखद धक्का बसल्याचे समोर आले आहे. घडले असे की परळी शहरातील गणेशपार भागात राहणाऱ्या चि. सुरेश शंकरराव मस्के हा दोन वर्षांचा असताना म्हणजेच बारा वर्षांपूर्वी त्याच्या हृदयाला गंभीर आजार झाला होता. घरची परिस्थिती अतिशय सामान्य असल्याने त्याचे वडील शंकरराव यांनी त्यावेळी धनंजय मुंडे यांना मदत मागितली. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी

» पान २ वर

# शाहिनबाग अंदोलनास विरोध करणाऱ्या पवारांना मुस्लिम समाज माफ करणार नाही : शेख खाजा

**गेवराई । किसान न्युज**



मुस्लिम समाजावर झालेल्या अन्यायाच्या अनुषंगाने देशभर समाजाला अंदोलन छेडावे लागले होते, गेवराईतही अनेक दिवस शाहिनबाग अंदोलन सुरु होते. तालुक्यातील सर्व पक्षियनेत्यांनी अंदोलनाला भेट देवुन पाठिंबा दिला होता. यामध्ये माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी वेळोवेळी अंदोलनस्थळी भेट देवुन समाजाला जाहिर पाठिंबा दिला. ज्या ज्या वेळी मुस्लिम विशेषत: अल्पसंख्यांक समाजावर अन्याय होतात त्या वेळी शिवछत्र परिवार कशाचीही पर्वा न करता समाजासाठी धावुन येतात मात्र गेवराई विधानसभा मतदार संघाचे त्यावेळी आमदार असतांनाही लक्ष्मण पवार यांनी या अंदोलनाकडे दुर्लक्ष करुन साधी भेट देण्याचेही औदार्य दाखवले नाही. त्यामुळे शाहिनबाग अंदोलनास विरोध करणाऱ्या पवारांना मुस्लिम समाज माफ करणार नाही असा इशारा प्रभाग क्रमांक १० चे उमेदवार शेख खाजाभाई यांनी दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई महेश दाभाडे आणि प्रभाग क्रमांक १० मधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार शेख खाजाभाई आणि डॉ. रेणुका संभाहरे यांनी प्रचारात आघाडी घेतली

» पान २ वर

# धार्मिक सलोखा वृद्धिंगत करणारे 'काकाजी'



## नंदकिशोर मुंदडा यांच्या नेतृत्वामुळे अंबाजोगाईत आजही टिकून आहे भाईचारा

**अंबाजोगाई । किसान न्युज**

अंबाजोगाई शहर धार्मिक सौहार्दासाठी संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जाते. देशातील अनेक शहरांमध्ये वेळोवेळी तणाव, दंगे, संघर्ष निर्माण झाले; पण अंबाजोगाई मात्र नेहमीच शांत, संयमी आणि एकदिलाने उभे राहिले. हिंदू-मुस्लीम ऐक्य, परस्परांवरील विश्वास आणि परंपरागत भाईचारा ही या शहराची खास ओळख आहे. ही संस्कृती अचानक निर्माण झालेली नाही. अनेक दशकांपासून स्थानिक नेतृत्वाने त्यासाठी सतत प्रयत्न केले, आणि जनतेनेही तितक्याच उत्साहाने या ऐक्याला जपले. येथील हिंदू-मुस्लीम भाईचारा जपण्यात मुंदडा परिवाराचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. स्व. विमलताई मुंदडा, कुटुंबातील ज्येष्ठ नेतृत्व करणारे काकाजी, तसेच पुढची पिढी म्हणून अक्षय मुंदडा आणि सून म्हणून आलेल्या आ. नमिता मुंदडा या सर्वांनी मिळून

» पान २ वर




» पान २ वर